**महाराष्ट्र शासन**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**
**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), महाराष्ट्र राज्य,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर -440022**
**Website :** www.vanarti.in **CIN: U84120MH2026NPL466492** **ईमेल-** : vanarti.info@gmail.com

**जावक क्र. वनार्टी/नागपूर/आस्था/610/2026-27** **दि.10/07/2026**

# -: परिपत्रक :-

**विषय :- वनार्टी संस्थेमार्फत सन 2026-27 या आर्थिक वर्षात राबविण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनांकरिता ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत.**

वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था(वनार्टी), नागपूर मार्फत सन 2026-27 या वर्षात राबविण्यात येणाऱ्या IBPS-PO/Banking/LIC/AAO, मिलिटरी/पोलीस भरती, शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी (TAIT), कर्मचारी निवड आयोग (SSC), MBA-CAT/CMAT/CET, रेल्वे भरती (RRB) या परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरिता विद्यार्थ्यांकडून दि. 08/06/2026 रोजी वनार्टीच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करून दि. 10/07/2026 पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते.

सदर प्रशिक्षणाकरिता ऑनलाईन अर्ज करण्यासाठी अनेक विद्यार्थ्यांनी मुदतवाढ देण्याकरिता वनार्टी कार्यालयाच्या कॉल सेंटरला विनंती केलेली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या कार्यालयास केलेली विनंती विचारात घेता सदर योजनांकरिता ऑनलाईन अर्ज करण्यासाठी **दि. 17/07/2026 रोजी** पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

तसेच ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी ऑनलाईन अर्ज सादर केलेला आहे परंतु चाळणी परीक्षेसाठी परीक्षा केंद्राकरिता प्राधान्यक्रम निवडलेला नाही अशा विद्यार्थ्यांना चाळणी परीक्षेसाठी प्राधान्यक्रम निवडण्याकरिता सुचना निर्गमित करण्यात येत आहे, सर्व संबंधीत विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी.

**स्वा**
(प्रशांत वावगे)
**व्यवस्थापकीय संचालक (प्र.)**
वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था
(वनार्टी)